# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk२a@dte.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : २अ/एडीएम/२०१६/ ९७३
दिनांक : 25 MAY 2016

विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता तंत्रशिक्षणांतर्गत येणा-या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसंबंधी

महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५,दिनांक १७.८.२०१५ नुसार महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायीक शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित तदनुषंगिक बाबींकरिता अधिनियम अस्तित्वात आला आहे. या अधिनियमातील तरतूदीनुसार शासनाने अधिसुचित केलेल्या खालील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश आयुक्त, प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेमार्फत एक खिडकी पध्दतीने (आवश्यक असल्यास सामायिक परीक्षेद्वारे) प्रवेश करण्याचे शासनाचे धोरण आहे.

अ. पदविका अभ्यासक्रम (Post SSC, Post HSC, Direct Second Year)

ब. पदवी अभ्यासक्रम (First Year Engineering, Pharmacy, Architecture, HMCT, Pharm D & Direct Second Year Engineering, Pharmacy)

क. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम (First Year MBA, MCA, M.Arch, M.HMCT, ME/M.Tech, M.Pharm & Direct Second Year MCA)

या प्रवेश प्रक्रियेकरिता संस्थांनी खालील बाबींची नोंद घ्यावी.

१. राज्यातील तंत्रशिक्षणाअंतर्गत पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठीची शैक्षणिक अर्हता शासन राजपत्र असाधारण क्रमांक ७४ आणि प्रवेश नियम शासन राजपत्र असाधारण क्रमांक अनुक्रमे ७७, ७६,७५ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. सदर प्रवेश नियमातील तरतूदीनुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील प्रवेश प्रक्रिया पार पाडल्या जाणार आहेत. सदर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष हे सक्षम प्राधिकारी म्हणून काम करतील.

२. पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीभूत पध्दतीने राबविण्यात येणार आहे. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून (महाराष्ट्र कोटा, ऑल इंडिया कोटा व अल्पसंख्याक कोटा) तसेच संस्थास्तरावरील प्रवेशासाठी उपलब्ध असलेल्या जागांवर प्रवेशासाठी संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक 3639
2 6 MAY 2016

३. अर्ज भरल्यानंतर उमेदवारांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट घेऊन सुविधा केंद्रावर (Facilitation Centre) जाऊन अर्ज निश्चिती करणे व त्याचवेळी संबंधित प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीसाठी सादर करून अर्ज स्वीकृतीची प्रत घेणे अनिवार्य आहे.

४. सर्व उमेदवारांनी सुविधा केंद्रांवर (Facilitation Centre) जाऊन अर्जनिश्चिती व प्रमाणपत्रांची पडताळणी करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. जे उमेदवार अशा प्रकारे अर्जनिश्चिती व प्रमाणपत्रांची पडताळणी सुविधा केंद्रांवर करून घेतील अशाच पात्र उमेदवारांची नावे **सक्षम प्राधिकारी यांनी तयार केलेल्या** गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट करण्यात येतील.

५. गुणवत्ता यादीमध्ये असलेल्या उमेदवारांनाच केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता उपलब्ध असलेल्या जागांवर गुणवत्तेच्या आधारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश देण्यात येतील.

६. **संस्थास्तरावरील** (Institutional Quota) **प्रवेशासाठीसुध्दा आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी तयार केलेल्या <u>गुणवत्ता यादीत उमेदवाराचे नाव असणे अनिवार्य आहे.</u>**

७. तंत्रशिक्षणांतर्गत अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणा-या NRI, OCI/ PIO, Foreign Students and the children of Indian Workers in Gulf Countries या प्रकारातील उमेदवारांनाही **सक्षम प्राधिकारी यांचेकडे** प्रवेशासाठी अर्ज निश्चिती व प्रमाणपत्र पडताळणी करणे अत्यंत आवश्यक आहे. **तदनंतर उमेदवार इच्छित संस्थेत संस्थास्तरावरील प्रवेशासाठी अर्ज करतील.**

८. **<u>गुणवत्ता यादीमध्ये समाविष्ट नसलेल्या उमेदवारांचा कोणत्याही प्रकारच्या प्रवेशासाठी विचार करण्यात येणार नाही</u>.**

९. **सक्षम प्राधिका-याने** तयार केलेल्या **<u>गुणवत्ता यादीत नाव नसलेल्या उमेदवारांना संस्थांनी परस्पर संस्थास्तरावर प्रवेश दिल्यास असे प्रवेश अवैध ठरतील</u>** या बाबीची उमेदवारांनी व संस्थांनी नोंद घ्यावी.

**प्रत्येक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचे वेळापत्रक** www.mahacet.org तसेच या संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करण्यात येईल.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १)सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर याना माहीती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
२)संचालक/प्राचार्य, सर्व पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी संबंधित संस्था यांना माहीती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

D:\Budage\२०१६-१७\General Correspondence\Notification of registration must for IL Quota.docx